# महिला सक्षमीकरण : मानके आणि आव्हाने समाजशास्त्रीय चिकित्सा

**डॉ. परसराम तुकाराम बाचेवाड**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
Email : ptbachewad@gmail.com

**गोषवारा (सारांश) :**

*भारतीय संस्कृतीमध्ये नारीशक्तीची संकल्पना पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. भारतात अनादिकाळापासून देवीच्या विविध रूपात ही उपासना करण्याची पध्दती आहे. पुर्व भारतात काली, म्हैसासूर, मर्दिनी आणि केरळमध्ये भगवती या सारख्या विविध रूपात देशभरात देवीची उपासना आणि आराधना करण्यात येते.*

*परंतु ही नाण्याची एक बाजू आहे. दुस-या बाजूला महिलांना त्यांच्या जीवनात आणि कुटूंबात मत व्यक्त करण्यात स्वातंत्र्यपण दिले जात नाही. त्याचं जीवन हे पुरूषांच्या अधीन असते. त्यांच्या अशा-आकांक्षा इच्छांना महत्व दिले जात नाही. मुलगी,पत्नी आधी मातृत्वाची भुमिका निभावण्यातच महिलांचे आयुष्य संपते प्रस्तुत शोधनिबंधात याच मुद्यांच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा केली जाणार आहे.*

***महत्त्वपुर्ण शब्द :-*** *महिला सक्षमीकरण, मानके, आव्हाने.*

**प्रस्तावना :**

आजच्या काळात महिला सक्षमीकरण ही अत्यंत गुंतागुंतीची बहुआयमी संकल्पना आणि विस्तृत चर्चेचा विषय आहे. सबलीकरण चळवळीचे स्वरूप लिंगभेदावर आधारित शोषण प्रक्रिया नष्ट करण्यासोबतच स्त्री-पुरूष समानतेची व्यवस्था निर्माण करून विकासाची अपेक्षा समान संधी त्याचबरोबर समान प्रतिष्ठा, दर्जा, निर्णय प्रक्रियेत सहभाग असावा अशी आहे.

स्त्रीला एक मानव म्हणून विकास करण्याची समान संधी लिंगभेद विरहीत समाजव्यवस्था निर्माण करणे आणि तिच्या नावे जन्मापासूनच अंकित केलेला दुय्यम दर्जा मिळवून तिच्या स्थायी असलेले कौशल्य, सामर्थ्य आदि गुणांना वाव मिळणे अपेक्षित आहे. परंतु, आजही स्त्री आर्थिकदृष्ट्या उदासीन, शिक्षणात दुर्लक्षित, कुंटुंबात दुय्यम, समाजात उपभोगाची वस्तू बनलेली आहे.

देश एकविसाव्या शतकाच्या भौतिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या शिखरावर पोहोचला असला तरी स्त्री-पुरूष समानतेचा प्रश्न अद्यापही पाहिजे त्या प्रमाणात सोडवता आलेला नाही. ही खंत आहे.[१]

**संशोधन पध्दतीशास्त्र :**

**उद्दिष्ट्ये :**

१. महिला सक्षमीकरण संकल्पनेचे अध्ययन करणे.
२. महिला सक्षमीकरणाचे मानके आणि आव्हाने यांचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्ये :**

१. महिला सक्षमीकरण ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी प्रक्रिया आहे.
२. महिला सक्षमीकरण आव्हाने हीच महिला सबलीकरणामधील प्रमुख अडचण ठरत आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोध निबंध हा पुर्णपणे द्वितीयक स्त्रोतांवर आधारित आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रस्तुत विषयाशी संबंधीत विविध ग्रंथ, संदर्भ, ग्रंथ शासनाचे प्रकाशित अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, विविध लेख, इ. उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

**महिला सक्षमीकरण संकल्पनात्मक मांडणी :**

महिला सक्षमीकरण ही संकल्पना ख-या अर्थाने दुस-या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपाला आलेली असून महिला सक्षमीकरणाची जाणीव वैश्विक बनविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे योगदान हे महत्वपूर्ण असलेले दिसून येते.१० डिसेंबर १९४८ रोजी प्रकाशित झालेल्या मानवी हक्क जाहीरनाम्यामध्ये महिला सक्षमीकरणावर विशेष भर दिलेला दिसून येतो.[२]

आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला सक्षमीकरणासाठी व महिलांना पुरूषांच्या बरोबरीनेस्थान मिळवून देण्यासाठी १९६५ साली मेक्सिको सिटी येथे पहिली जागतिक महिला परिषद झाली. यामध्ये जागतिक महिला कृती कार्यक्रमाचा स्विकार करण्यात आला. १९८० या साली कोपनहेगन येथे दुसरी जागतिक महिला परिषद झाली यामध्ये जागतिक सहकार्य व शांततेची प्रस्थापना हे ध्येय निश्चित करण्यात आली. १९८५ साली नैरोबी येथे तिसरी जागतिक महिला परिषद झाली.[३]

जगातील सर्व समाजातील स्त्री-पुरूषातील भेदभावाची दरी कमी करून त्यांना समान सीमारेषेवर आणणारी महत्वपुर्ण चळवळ म्हणून महिला सक्षमीकरणाकडे पाहिले जाते. अबला महिलांना सबल करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने आणण्यासाठी प्रयत्न करणे हे महिला सक्षमीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे.

महिला सक्षमीकरण्याची संकल्पना ही दुस-या महायुध्दानंतर जरी विशेष रूपाने नावारूपाला आली असली तरी अठराव्या शतकामध्ये प्रसिध्द लेखिका मेरी कलस्टोन क्राफ्ट यांचे "व्हिन्डिकेशन ऑफ द राइटस ऑफ वुमेन" हे पुस्तक म्हणजे महिला सक्षमीकरणाचा पुरस्कार करणारी पहिली महत्वपुर्ण साहित्यकृती आहे.[४]

१९ व्या शतकात विल्यम थॉमसन, हॅरियट टेलर, जॉन स्टुअर्ट मिल यासारख्या साहित्यकारांनी व विचारवंतानी स्त्रीमुक्ती विचार तत्कालीन समाजामध्ये रूजविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**महिला सबलीकरणाची मानके :**

स्त्रीला स्वत:बद्दलची जाणीव, निर्णय घेण्याचा आणि पर्याय निवडण्याचा अधिकार, संधी आणि संसाधनापर्यंत पोहोचण्याचा अधिकार घर आणि घराबाहेर स्वत:चे आयुष्य स्वत:च्या इच्छेनुसार जगण्याचा नियंत्रित करण्याचा अधिकार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर बदलाची दिशा प्रभावित करून अगदी न्यायपुर्ण सामाजिक आणि आर्थिक सुव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता या पार्श्वभूमीवर आज व्यवसायी, नोकरदार महिला सुध्दा स्वत:ला सक्षम मानत नाही.[५]

**महिला सबलीकरणा समोरील प्रश्न आणि आव्हाने :**

सबलीकरण ही एक प्रक्रिया आहे.लैगिंक असमानता आणि सत्तेतून उद्भवणारा स्त्रियांना दुय्यम अबला ठरवण्याचा अमानुष खेळ आहे.[६]

इतिहास साक्षी आहे की, मुळातच भारतीय महिला ही कधी अबला नव्हतीच भारत हा नवदुर्गेची पुजा करणारी संस्कृती मानणारा, स्त्रीशक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एका स्त्रीचा सहभाग असतो, हे आपण इतिहासापासून ते अगदी वर्तमानातही अनुभवतो आहोत त्यामुळे अनेकांचे आधारवड असलेल्या मातृशक्तीला अधिक सशक्त समाजनिर्मितीसाठी अधिकाधिक सृदृढ आणि सक्षम बनवणे समाजाची जबाबदारी आहे. परंतु स्त्री नावाच्या या वटवृक्षाला समस्यांचे अनेक कोपरे आहेत. सुखी, समृध्द जीवन जगण्यासाठी बहुआयामी स्तरावर प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. केवळ कायदेशीर तरतुदीने हे होणे शक्य नाही. त्याला बदलण्याच्या मानसिकतेची अमूल्य चळवळी सुध्दा आवश्यक आहे.

स्त्रियांचे अनेक प्रश्न सामाजिक, आर्थिक, राजकीय या सदराखाली मोडतात त्यात पुढील मुद्दे प्रामुख्याने महत्वाचे ठरतात. १.सृदृढ स्वास्थ व लैगिंक आरोग्य २. नैसर्गिक साधनसंपत्तीची राखणावळ ३. आर्थिक सक्षमता ४. शैक्षणिक सक्षमता ५. राजकीय सक्षमता ६. मानसिक सक्षमता.[७] महिला सबलीकरण एक जटिल प्रक्रिया

सक्षमीकरणाची अत्यंत जटिल व किचकट अशी ही प्रक्रिया स्त्री-पुरूष समानता पातळीवर अवलंबून असते.

अग्रक्रमाने मांडलेल्या गरजांमध्ये प्रथम पायरीवर मूलभूत स्वरूपाच्या कल्याणकारी (रोटी, मकान, कपडा) संसाधना पर्यंत पोहोचने प्रवेश, स्वत्वाची जाणीव या नोड्सनुसार प्राथमिक गरजा पुर्ण होत नाहीत तोपर्यंत पुढच्या पायरी पर्यंत आपण पोहोचू शकत नाही

काळामानानुसार या गरजा बदलत सुध्दा असतात, त्यास योग्य तो प्रतिसाद देणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे.

**निष्कर्ष :**

१. महिला सक्षमीकरण ही एक दिर्घकाळ चालणारे प्रक्रिया आहे, यामध्ये स्त्रियांना आर्थिक स्वात्तंत्र्य देणे, हिंसाचारापासून मुक्ती प्रदान करणे, स्त्रियांना निर्णय प्रक्रिया मध्ये सहभागी करून घेणे वगैरे बाबींचा अंतर्भाव होतो.

२. सबलीकरणाची मानके म्हणूस्न मुख्यत्वे करून शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन, कायदेविषयक जागरूकता कार्यक्रम व विविध संस्थाचे साह्य इत्यादींचा समावेश प्रामुख्याने होतो.

३. स्त्रीकडे माणूस म्हणून न पाहता एक वस्तू म्हणून पाहण्याची पुरूषांची वृत्ती आता बदलली पाहिजे.

४.स्त्रीयां विषयी पुर्वग्रह, खोट्या धारणा, उपेक्षा, दुय्यम वागणूक हे वर्तन समाजाचे आता बदलेले पाहिजे.

५. परंपराची तपासणी बुद्धी प्रामाण्यवादी दृष्टिने करावी.

**समारोप :**

महिला सबलकरण हा केवळ सभा समित्या, कार्यक्रमांमध्ये व्याख्यानाचा विषय आहे. तसे न होता वास्तविक त्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा सर्व संमत अधिकार मिळणे ही भारतासारख्या शक्तीशाली देशासाठी काळाची गरज आहे.

**संदर्भसूची :**

१. देखमुख, निलिमा यांचा अर्धे अकाशः महिला सबलीकरण : मानके आणि आव्हाने, दैनिक दिव्य मराठी, मधील दिनांक २/२३/२०२४चा लेख पृ.क्र. ०२

२. singh.R.V., 2011 Women Empowerment in india, Shree Publishers and distributors new delhi.p.116

३. माकवान,रमेश, कुरूक्षेत्र, जून २००५, महिलाओ का राजनीतिक सशक्तीकरण समाजशास्त्रीय अध्ययन, पृ.क्र. २२.

४. गजेवार, डी.एन., २०१३ स्त्री पुरूष अभ्यासतील आव्हाने आणि उपाय, अपुर्वा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद. २०१३.पृ.११७

५. ठाकूर,सुरेद्र, आणि कनकदंडे, श्वेतांबरी, २०१९ सामाजिक संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. पृ.क्र. ६०

६. दै. लोकसत्ता (अग्रलेख), महिला सक्षमीकरण दिशा व दशा, दि. ८ मार्च २०१०

७. ठाकूर, सुरेंद्र, आणि कनकदंडे, श्वेतांबरी , २०१९ सामाजिक संस्था, विद्य बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. पृ.क्र. ६१,६२